दि. १२/०६/२०१९

**" भिवंडी मधुन १ वर्षाचे मुलाचे अपहरण केलेल्या आरोपीस गुन्हे शाखा, भिवंडी युनिट–२ यांनी ८ दिवसामध्ये जेरबंद करून अपहरण झालेल्या मुलास परत मिळविले. "**

भिवंडी शहर पोलीस स्टेशन, धामणकरनाका, पुलाचे खाली, भाजीमार्केट, पद्मानगर येथे दिनांक ०३/०६/२०१९ रोजी रात्रौ ०१.३० वा. ते ०५.०० वा. च्या सुमारास आईचे कुशीमध्ये झोपलेले बालक कुमार आशिक (बाबु) चंदुल हरजन वय– ०१ वर्ष याचे कोणीतरी अज्ञात इसमाने आई वडीलांचे कायदेशिर रखवालीमधुन अपनयन केले होते. त्याबाबत बालकाचे वडील श्री. चंदुल रामप्यारे हरजन यांनी दिलेल्या तक्रारीवरून भिवंडी शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ०३१२/२०१९ भादंविसं कलम ३६३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शितल राऊत यांनी मिळालेल्या माहितीचे आधारे गुन्हा करणारे आरोपी निष्पन्न करून गुन्हयातील संशयीत आरोपी रेकॉर्डवरील वाहन चोरी करणारा रोहित प्रदिप कोटेकर वय– २३ वर्ष राहणार– नदीनाका, शालीनी हॉटेलचेवर, दुसरा मजला, भिवंडी याची माहिती मिळाल्याने त्यास दिनांक १०/०६/२०१९ रोजी सकाळी ०९.१० वा. अटक केली. त्याने सदरचा गुन्हा त्याचा साथीदार व रेकॉर्डवरील वाहन चोरी करणारा सुरज रमेश सोनी रा. पद्मानगर, भिवंडी याचे साथीने त्यांचेवर झालेले कर्ज फेडण्याकरीता केला असल्याची कबुली दिली.

गुन्हयामधील अपनयन बालक कुमार आशिक (बाबु) यास महाराजगंज, उत्तरप्रदेश येथे नेपाळ हद्दीला लागुन असलेल्या गावात विक्री केल्याचे सांगितले. मिळालेल्या माहितीच्या आधारे व वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाने सपोनि/महेंद्र जाधव, व मपोना/२७७४ मेघना कुभांर यांचे पथक तातडीने महाराजगंज, उत्तरप्रदेश येथे पाठवुन स्थानिक पोलीसांचे मदतीने मु.पो. एकसडवा, ता. कोल्हुई जि. महाराजगंज, राज्य उत्तरप्रदेश येथुन एका महिलेचे कब्जातुन सदरचे अपहृत बालक ताब्यात घेतले. गुन्हयातील आरोपींचे बावत काहीही धागेदोरे नसताना गुन्हा करणारे आरोपींना ८ दिवसामध्ये अटक करून अपनयन झालेले बालक परत मिळवुन त्यास त्याचे आई–वडीलांचे कडे सुपुर्द केले. सदर गुन्हयाचा तपास हा प्राथमिक स्वरूपात असुन पुढील तपासात ज्या व्यक्तींचा सहभाग आहे. त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्याची तजविज ठेवली आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसाळकर, मा. पोलीस सह आयुक्त, डॉ. सुरेशकुमार मेकला , मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. प्रविण पवार, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री. दिपक देवराज व मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, शोध–१, ठाणे श्री. एन. टी. कदम यांचे मार्गदर्शनपर सुचनांनुसार झालेली आहे.

